# पर्यावरणपूरक इमारतींच्या चळवळीत महाराष्ट्राची आघाडी; सरकारी इमारतींच्या पर्यावरणीय कामगिरीच्या मूल्यमापनासाठी ग्रिहा कौन्सिलशी हातमिळवणी

**- ३०० इमारतींचे मूल्यमापन पूर्ण, उर्वरित ५२५ इमारतींचे मूल्यमापन लवकरच**

**- पर्यावरणपूरक इमारतींच्या मूल्यमापनासाठी ग्रिहा कौन्सिल देणार सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना प्रशिक्षण**

**- अस्तित्वातील इमारतींचा टिकाऊपणा वाढवण्यासाठी ग्रिहाच्या धोरणात्मक मार्गदर्शक तत्त्वांचे श्री. नितीन गडकरी यांच्या हस्ते प्रकाशन**

**नागपूर, १४ जून २०१९ :** पर्यावरणपूरक इमारतींच्या मानांकनाशी निगडित संस्था असलेल्या ग्रिहा कौन्सिलने आज महाराष्ट्र सरकार, प्रादेशिक मुख्य अभियंते आणि सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्यासह महाराष्ट्रातील पीडब्ल्यूडी-ग्रिहा पर्यावरणपूरक इमारती उपक्रमाच्या दुसऱ्या टप्प्यासाठी सहा सामंजस्य करार केले. यामध्ये ग्रिहा अस्तित्वातील इमारतींच्या मानांकन पद्धतीच्या आधारे ५२५ अस्तित्वातील सरकारी इमारतींचे मानांकन आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण आणि क्षमता निर्मिती यांचा समावेश आहे. यापूर्वी या उपक्रमाच्या पहिल्या टप्प्यात अस्तित्वातील ३०० सरकारी इमारतींचे मानांकन पूर्ण करण्यात आले होते. अस्तित्वातील आणि भविष्यात उभारण्यात येणाऱ्या सुविधा पर्यावरणपूरक मानकांनुसार विकसित करण्यासाठी कटिबद्ध राहून आपल्या अधिकाऱ्यांना या इमारतीच्या पर्यावरणीय निकषांच्या मूल्यमापनासाठी प्रशिक्षण देण्यासाठी आणि विकासकांना पर्यावरणपूरक उपायांच्या अवलंबासाठी प्रोत्साहन देण्यासाठी पुढाकार घेणारे महाराष्ट्र हे भारतातील पहिले राज्य आहे. ग्रिहाने सार्वजनिक बांधकाम विभागात कक्ष देखील स्थापन केला असून त्यामार्फत विभागाच्या अधिकाऱ्यांना पर्यावरणपूरक इमारतींचे मूल्यमापक म्हणून क्षमता निर्मिती करण्यासाठी साह्य केले जाते. यामुळे शहरी जागा अधिकाधिक पर्यावरणपूरक करण्याच्या प्रक्रियेला गती मिळणार आहे.

**नागपूर येथे आयोजित ग्रिहाच्या १०व्या प्रादेशिक परिषदेत** या सामंजस्य करारांवर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. महाराष्ट्र सरकारच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सहकार्याने, **रस्ते वाहतूक व महामार्ग आणि लघु व मध्यम उद्योग मंत्री श्री. नितीन गडकरी** यांच्या प्रमुख उपस्थितीत या एकदिवसीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. स्रोतांचा किफायतशीर वापर करून अस्तित्वातील इमारतींचे आयुर्मान वाढावे, यासाठी अवलंबायच्या शाश्वत उपायांसंदर्भात धोरणात्मक मार्गदर्शक तत्त्वांचे प्रकाशनही श्री. गडकरी यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी **रस्ते वाहतूक व महामार्ग आणि लघु व मध्यम उद्योग मंत्री श्री. नितीन गडकरी** म्हणाले, “ऊर्जेच्या वापरात आणि प्रदूषणकारी वायूंच्या ऊत्सर्जनात इमारतींचा वाटा मोठा आहे. पर्यावरणपूरक इमारतींमुळे आयुर्मान, उत्पादनक्षमता आणि जीवनमान उंचावते. त्यामुळे हा स्तुत्य उपक्रम हाती घेतल्याबद्दल मी ग्रिहा कौन्सिलचे अभिनंदन करतो. अधिक पर्यावरणपूरक भविष्य घडवण्याच्या आपल्या प्रयत्नांना यामुळे नवी दिशा मिळेल, असा मला विश्वास आहे.”

पीडब्ल्यूडी-ग्रिहा पर्यावरणपूरक इमारत उपक्रमाच्या पहिल्या टप्प्याच्या पूर्ततेचे यशही याप्रसंगी साजरे करण्यात आले. १६ जानेवारी २०१९ रोजी याबाबतचा करार करण्यात आला होता, ज्याअंतर्गत ग्रिहा ईबी (एग्झिस्टिंग बिल्डिंग - अस्तित्वातील इमारती) मानांकन निकषाच्या आधारे ३०० सरकारी इमारतींचे मानांकन करण्यात येणार होते. या अंतर्गत अलिकडेच मूल्यमापन करण्यात आलेल्या **नवी दिल्लीतील महाराष्ट्र सदन**ने **चार तारांकित मानांकन** मिळवले आहे.

याप्रसंगी पात्र प्रकल्पांना मानांकने देण्यात आली, तसेच या संपूर्ण उपक्रम कालावधीत लक्षणीय कामगिरी करणाऱ्या सार्वजनिक बांधकाम विभागातील अधिकाऱ्यांचा पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला.

याप्रसंगी **ग्रिहा कौन्सिलचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजय सेठ** म्हणाले, “या उपक्रमासाठी महाराष्ट्र सरकारच्या सहकार्याने काम करण्याची संधी मिळणे, हे आमचे भाग्य आहे. शहरी भागातील बांधकाम पर्यावरणात मोठ्या प्रमाणावर बदल घडवण्यासाठी महाराष्ट्राने घेतलेला पुढाकार उत्साहित करणारा आहे. राज्याच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने ग्रिहा कौन्सिलच्या सहकार्याने सुरू केलेल्या या छोट्याशा उपक्रमाच्या पहिल्या टप्प्यातच वार्षिक २७२१ टन इतक्या कार्बन उत्सर्जनला आळा घालण्यात यश आले आहे. हे प्रमाण रस्त्यावरून ६०० वाहने हटवण्याइतके आहे.”

**‘बांधकाम पर्यावरणातील आमूलाग्र बदलासाठी निती’** या सूत्रावर आधारित या परिषदेत अस्तित्वातील सार्वजनिक इमारतींनी पर्यावरणपूरक उपायांचा अवलंब केल्यास होणाऱ्या परिणामांवर भर देण्यात आला. या विषयातील विविध घटक व भागधारकांना एकत्र येण्याची संधी देणे, ज्ञान व माहितीचे आदानप्रदान आणि सरकार, अभ्यासक, नागरी संस्था, स्थापत्य, अभियांत्रिकी व बांधकाम व्यवस्थापन यांना एकत्र आणण्याच्या दृष्टीने या परिषदेचे आयोजन करण्यात आले होते.

पीडब्ल्यूडी-ग्रिहा पर्यावरणपूरक इमारत उपक्रमाच्या पहिल्या टप्प्यातील कामगिरी दाखवणारा तक्ता :

| इमारतीचा प्रकार | प्रदेश | प्रस्तावित इमारतींची संख्या | एकूण इमारती | मानांकन | |
|---|---|---|---|---|---|
| | | | नोंदणीकृत | प्रक्रिया पूर्ण | प्रगतीपथावर |
| **नवीन इमारती (ग्रिहा)** | नागपूर | १०१ | ८४ | १ | ८३ |
| | अमरावती | ३६ | १९ | ० | १९ |
| | औरंगाबाद | २१ | २० | ० | २० |
| | नाशिक | ० | ० | ० | ० |
| | पुणे | ३६ | २५ | १ | २४ |
| | मुंबई | ४ | ४ | ० | ४ |
| | कोकण | ३ | ३ | ० | ३ |
| | **एकूण** | **२०१** | **१५५** | **२** | **१५३** |
| **अस्तित्वातील इमारती (ग्रिहा ईबी)** | नागपूर | ९१ | ९१ | ५२ | ३९ |
| | अमरावती | ३० | ३० | २८ | २ |
| | औरंगाबाद | ३७ | ३७ | २८ | ९ |
| | नाशिक | ५९ | ५९ | ३४ | २५ |
| | पुणे | ४३ | ४३ | ३९ | ४ |
| | मुंबई | १२ | १२ | ७ | ५ |
| | कोकण | २८ | २८ | १३ | १५ |
| | **एकूण** | **३००** | **३००** | **२०१** | **९९** |

**ग्रिहा कौन्सिलविषयी**

**ग्रिहा कौन्सिल** ही **'द एनर्जी अँड रिसोर्सेस इन्स्टिट्यूट'** (टेरी) आणि **भारत सरकारच्या नवीन व अपारंपरिक ऊर्जा विभागाने** (एमएनआरई) स्थापन केलेली स्वतंत्र व सेवाभावी संस्था आहे. टेरीने विकसित केलेल्या 'ग्रिहा' या स्वदेशी मानांकन पद्धतीचा प्रचार व अमलबजावणीसाठी या संस्थेची स्थापना करण्यात आली असून 'एमएनआरई'ने भारतातील पर्यावरणपूरक इमारतींसाठी राष्ट्रीय मानांकन पद्धती म्हणून तिचा स्वीकार केला आहे. पूर्वनिश्चित निकषांनुसार इमारतीची कामगिरी आणि पर्यावरणावर तिचा होणारा परिणाम याचा अभ्यास करून त्यानुसार एक ते पाच पर्यंत मानांकन दिले जाते. **भारत सरकारच्या पर्यावरण, वने आणि वातावरण बदल विभागाने** संयुक्त राष्ट्रांच्या

पर्यावरण बदल विषयक रूपरेषा परिषदेला (युनायटेड नेशन्स फ्रेमवर्क कन्व्हेन्शन ऑन क्लायमेट चेंज - यूएनएफसीसीसी) वातावरणातील बदलाच्या आव्हानाचा मुकाबला करण्यासाठी सादर केलेल्या **राष्ट्रीय योजने**तील ग्रिहा हा महत्त्वाचा घटक आहे.

---

संपर्क

एडलमन- अशिता कुलश्रेष्ठ

Ashita.kulshreshtha@edelman.com

मोबाइल : ९९१९३३३०६६